दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

### आजचे पंचांग

सोमवार दि. ६ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, कृष्णपक्ष, चतुर्थी दुपारी २-११ पर्यंत, दिवस नक्षत्र–अनुराधा रात्री २-५७ पर्यंत नंतर ज्येष्ठा,
चंद्र रास- वृश्चिक, सूर्य रास - मीन, गुरु रास - मिथुन

### वृक्षारोपणाला जागाच नाही

**पुणे**: मेट्रो कामांमुळे तोडल्या जाणाऱ्या २३८६ झाडांच्या बदल्यात ४१ हजार झाडे लावण्याची योजना महामेट्रोने आखली असली, तरी त्यासाठी शहरात जागाच उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. वृक्ष लागवडीच्या जागेसाठी विविध सरकारी संस्थांना जागेची विचारणा करणारे पत्र महामेट्रो नुकतेच पाठवले आहे. त्यामुळे पुण्यातील मोकळ्या जागांच्या तीव्र टंचाईचे गांभीर्य अधोरेखित झाले आहे. शहरातच जागा नसताना ही झाडे नेमकी कुठे लावली जाणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. ६ एप्रिल, २०२६ | वर्ष - १ | अंक - १९१ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### चंदीगड स्फोटातील सूत्रधारांना अटक

**चंदीगड** : पंजाब भाजपच्या मुख्यालयाबाहेर झालेल्या स्फोटाचे मुख्य सूत्रधार असल्याचा आरोप असलेल्या दोन जणांना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती पंजाबचे पोलीस महासंचालक गौरव यादव यांनी दिली. त्यांना शनिवारी रात्री हरियाणाच्या रेवाडी येथे अटक करण्यात आली. त्यांची नावे गुरतेज सिंग आणि अमनप्रीत सिंग आहेत. दोघेही पंजाबमधील रुपार येथील रतनगड गावचे रहिवासी आहेत.

### प्रतिबंधित क्षेत्रात प्रवेश, एकाला अटक

**जयपूर** : राजस्थानच्या बिकानेर जिल्ह्यात भारत-पाकिस्तान आंतरराष्ट्रीय सीमेजवळ परवानगीशिवाय प्रतिबंधित क्षेत्रात प्रवेश केल्याच्या आरोपावरून ४० वर्षीय डॅनिश नागरिकाला ताब्यात घेण्यात आले. रेने नावाच्या या व्यक्तीला चौकशीसाठी बिकानेर येथील चौकशी केंद्रात पाठवण्यात आले असून, त्याच्या पासपोर्टच्या तपशिलाची पडताळणी केली जात आहे. आंतरराष्ट्रीय सीमेजवळील खाजुवाला भागातील हॉस्पिटल रोडवर तो संशयास्पद परिस्थितीत आढळला.

### काँग्रेस लोकांना एकत्र आणते

**गोलाघाट** : काँग्रेस नेते राहुल गांधी रविवारी म्हणाले की, त्यांच्या पक्षाचे तत्त्वज्ञान हे प्रसिद्ध संगीतकार झुबीन गर्ग यांचे आहे, ज्यांनी आसामला एकसंध करण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. बिस्वनाथ आणि गोलाघाट जिल्ह्यांमध्ये निवडणूक सभांना संबोधित करताना त्यांनी असा आरोप केला की, हिमंता बिस्वा सरमा हे भारतातील सर्वात भ्रष्ट मुख्यमंत्री आहेत आणि राज्यात काँग्रेसचे सरकार स्थापन झाल्यावर त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

# सिंहस्थ कुंभमेळा भव्य-दिव्य होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नाशिक** : आगामी सिंहस्थ कुंभमेळा भव्य आणि दिव्य करण्यासाठी राज्य सरकारकडून मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा उभारण्यात येणार असून सुमारे ३५ हजार कोटी रुपयांच्या कामांचा रोडमॅप तयार करण्यात आला असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. अखिल भारतीय संत संमेलनात बोलताना त्यांनी कुंभमेळ्याच्या तयारीबाबत सविस्तर माहिती दिली.

मुख्यमंत्री म्हणाले की, मागील कुंभमेळ्यापेक्षा यावेळी अधिक भाविक येण्याची शक्यता असून त्या दृष्टीने सर्व सुविधा तयार ठेवल्या जातील. नाशिक येथे जागेची मर्यादा असली तरी जास्तीत जास्त जागा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी रस्ते, रेल्वे आणि विमानतळ सुविधांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार करण्यात येणार आहे. तसेच गोदावरी नदी स्वच्छ ठेवण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात येणार आहेत. त्र्यंबकेश्वर येथे वर्षभर पाणी वाहते राहील यासाठीही विशेष प्रकल्प राबवण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले

कुंभमेळ्यादरम्यान उभारण्यात येणाऱ्या साधुग्रामसाठी आतापर्यंत शेतकऱ्यांकडून भाडेतत्त्वावर जमीन घेतली जात होती. मात्र आता सरकार थेट जमीन खरेदी करणार असल्याचा मोठा निर्णय मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाहीर केला. यामुळे कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी कायमस्वरूपी जागा उपलब्ध होणार आहे. सनातन संस्कृती अनेक आक्रमणांनंतरही टिकून असल्याचे सांगत मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रातील वारकरी परंपरेचा उल्लेख केला.

संतांच्या विचारांमुळे केवळ स्नान नव्हे तर मन शुद्ध होते, त्यामुळे कुंभमेळा हा केवळ धार्मिक नव्हे तर सांस्कृतिक आणि आध्यात्मिक पर्व असल्याचे त्यांनी सांगितले. संत-महंतांचा गैरवापर करून सनातन आणि संत संप्रदायाला बदनाम करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी दिला. राज्यात गोवंश हत्या कायदा लागू असल्याचे त्यांनी पुन्हा स्पष्ट केले. तसेच लव्ह जिहाद संदर्भातही सरकार धोरणात्मक निर्णय घेणार असल्याचे संकेत त्यांनी दिले. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मोठ्या प्रमाणावर नियोजन सुरू केले असून पायाभूत सुविधा, वाहतूक, पाणी, स्वच्छता आणि साधुग्राम यांसारख्या महत्त्वाच्या बाबींवर विशेष भर दिला जाणार आहे. त्यामुळे येणारा सिंहस्थ कुंभमेळा हा आतापर्यंतचा सर्वात मोठा आणि सुव्यवस्थित कुंभमेळा ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## बारामती निवडणुकीत लक्ष्मण हाके उतरणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बारामती विधानसभा निवडणूक बिनविरोध व्हावी असे आवाहन केले असले तरी या निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल होण्याची शक्यता वाढली आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी बारामती विधानसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

महायुतीकडून ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी प्रयत्न सुरू होते. मात्र त्याला अपेक्षित प्रतिसाद मिळताना दिसत नाही. लक्ष्मण हाके यांनी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याने बारामतीच्या राजकारणातील तिढा आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. हाके म्हणाले की, ही निवडणूक सहानुभूतीच्या लाटेवर होत आहे याची आम्हाला कल्पना आहे. मात्र सरकारकडून ओबीसींच्या मागण्या पूर्ण होत नाहीत, आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित आहे आणि निवडणूक न होणे लोकशाहीला मारक ठरेल. त्यामुळे ही निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

हाके हे अपक्ष म्हणून निवडणूक लढणार की एखाद्या पक्षाकडून उमेदवारी घेणार, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र राष्ट्रीय पक्षाशी संपर्क सुरू असून दोन दिवसांत याबाबत निर्णय जाहीर केला जाईल, असे त्यांनी सांगितले. बारामती मतदारसंघातील वातावरण भावनिक असल्याचे सांगत हाके म्हणाले की, मागील काही वर्षांपासून त्यांनी बारामती तालुक्यातील गावागावात जाऊन लोकांच्या समस्या जाणून घेतल्या आहेत. आम्ही बारामतीकरांना मतदानरूपी दान मागणार आहोत, असेही त्यांनी सांगितले.

## सुनेत्रा पवार आज अर्ज भरणार; बिनविरोध निवडीचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**बारामती** : बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. दिवंगत अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या या मतदारसंघासाठी अर्ज भरण्याची आज अंतिम मुदत आहे.


उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी सुनेत्रा पवार सकाळी श्री क्षेत्र कण्हेरी येथे मारुतीरायाचे दर्शन घेणार आहेत. त्यानंतर त्या विद्या प्रतिष्ठान येथे जाऊन दिवंगत अजित पवार यांच्या स्मृतीस्थळी अभिवादन करतील. कसबा भागातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला तसेच इंदापूर रस्त्यावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाला त्या वंदन करणार आहेत. यानंतर सकाळी साडेदहा वाजता कविवर्य मोरोपंत सभागृहात कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर प्रशासकीय भवनात जाऊन उमेदवारी अर्ज दाखल केला जाणार आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या पोटनिवडणुकीत सर्व पक्षांनी एकत्र येत सुनेत्रा पवार यांना पाठिंबा द्यावा आणि निवडणूक बिनविरोध करावी, असे आवाहन केले आहे.

### तेलवाहू जहाजाचा संभ्रम दूर; गुजरातमध्ये दाखल होणार

# तब्बल सात वर्षांनंतर इराणी जहाज भारतात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : इराणकडून सात वर्षांनंतर भारताकडे येणाऱ्या तेलवाहू जहाजाबाबत निर्माण झालेला संभ्रम अखेर दूर झाला आहे. 'पिंग शुन' हे तेलवाहू जहाज चीनकडे वळल्याच्या आणि पेमेंट अडचणीच्या चर्चा सोशल मीडियावर रंगल्या होत्या. मात्र, भारत सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने या सर्व बातम्या फेटाळून लावत जहाज भारताकडेच येत असल्याचे स्पष्ट केले आहे. सुमारे ६ लाख बॅरल कच्चे तेल घेऊन हे जहाज लवकरच गुजरातमधील वडीनार बंदरात दाखल होणार आहे.

गेल्या दोन दिवसांपासून इराणचे तेल घेऊन येणारे 'पिंग शुन' जहाज चीनकडे वळल्याच्या चर्चा सुरू होत्या. मात्र, मंत्रालयाने तांत्रिक बाबी स्पष्ट करत या अफवा असल्याचे सांगितले. जहाजाच्या 'बिल ऑफ लॅडिंग'मध्ये (वाहतूक पावती) अनेक वेळा डेस्टिनेशन बदलण्याची सुविधा असते. ऑपरेशनल लवचिकतेसाठी जहाज काही वेळा वेगवेगळे सिग्नल दाखवत असते. त्यामुळे जहाजाने चीनचे सिग्नल दाखवले असले तरी त्याचे अंतिम गंतव्य भारतातील वडीनार बंदर हेच असल्याचे सरकारने स्पष्ट केले. भारताने इराणला पेमेंट करण्यासाठी विशेष आर्थिक व्यवस्था केल्यामुळे सात वर्षांनंतर इराणचे तेल पुन्हा भारतात येत आहे. पिंग शुन या जहाजाने यापूर्वी कधीही भारताला तेलपुरवठा केलेला नव्हता. हे जहाज सुरुवातीला चीनकडे जाण्याचे संकेत देत होते, त्यानंतर अचानक गुजरातमधील वडीनार बंदराचे डेस्टिनेशन दाखवले. काही काळ पुन्हा दिशा बदलल्याच्या बातम्या आल्या होत्या. त्यामुळे संभ्रम निर्माण झाला होता. हे जहाज ४ एप्रिलला भारतात पोहोचणार होते, मात्र मध्येच ते चीनकडे वळवण्यात आल्याच्या बातम्यांमुळे खळबळ उडाली होती. आता मात्र जहाज भारताकडेच येत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

इराणने जगभरात इंधन तुटवडा असताना, भारताला मोठी सवलत दिली आहे. तेलपुरवठाच नव्हे, तर इराणने आपल्या नियंत्रणाखालील होर्मुझची सामुद्रधुनी भारतीय जहाजांसाठी खुली ठेवली आहे. युद्धजन्य परिस्थितीत याच मार्गावरून भारताची 'ग्रीन सान्वी'सह आठ कार्गो जहाजे सुरक्षित बाहेर पडली आहेत. २८ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या इराण-इस्रायल संघर्षामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला आहे. जगातील सुमारे २० टक्के तेल आणि गॅस पुरवठा होणारा होर्मुझचा मार्ग अंशतः बंद असल्याने तेलपुरवठा धोक्यात आला आहे. अशा परिस्थितीत इराणकडून थेट भारताला तेल मिळणे हे ऊर्जा सुरक्षेसाठी आणि इंधन दर व महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी महत्त्वाचे मानले जात आहे. त्यामुळे 'पिंग शुन' जहाज भारतात येणे हे धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे मानले जात आहे.

### कर्नाटक उच्च न्यायालयाचा निवाडा

# अटकपूर्व नोटीस प्रत्यक्ष बजावणे अनिवार्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बंगळूरु** : भारतीय नागरिक सुरक्षा संहिताच्या कलम ३५(३) अंतर्गत पोलिसांना अटकपूर्व नोटीस किंवा एफआयआरची प्रत व्हॉट्सॲप किंवा ईमेलद्वारे पाठवण्याचा अधिकार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय कर्नाटक उच्च न्यायालय यांनी दिला आहे. अटकपूर्व नोटीस प्रत्यक्ष स्वरूपात बजावणे अनिवार्य असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

माध्यमातील वृत्तानुसार, युगदेव आणि त्याच्या पत्नीवर योग शिक्षक असल्याचे भासवून 'जय भैरवी देवी' नावाची कंपनी चालवून गुंतवणूकदारांकडून पैसे गोळा करून सुमारे ९८ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात ९ डिसेंबर २०२५ रोजी अडुगोडी पोलीस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान कायदा २००० अंतर्गत तसेच भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी सुमारे ४० दिवस पोलिसांना चकवा देत असल्याने १७ जानेवारी २०२६ रोजी त्याला अटक करण्यात आली. अटकेपूर्वी पोलिसांनी त्याला प्रत्यक्ष नोटीस देण्याचा प्रयत्न केला होता, मात्र त्याने नोटीस स्वीकारण्यास नकार दिला. याचिकाकर्त्याने न्यायालयात असा युक्तिवाद केला की, पोलिसांनी नोटीस इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे पाठवू शकली असती. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती एम. नागप्रसन्न यांच्या एकलपीठाने स्पष्ट केले की, बीएनएसएसच्या कलम ३५ (पूर्वीचे सीआरपीसी कलम ४१ए) अंतर्गत इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून नोटीस पाठवणे कायदेशीर नाही. कायदेमंडळाने जाणीवपूर्वक अशी तरतूद कायद्यात केलेली नाही, असे न्यायालयाने नमूद केले. न्यायालयाने सतेंद्र कुमार अंतिल विरुद्ध सीबीआय या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दाखला देत म्हटले की, कायदेमंडळाने अभिप्रेत नसलेली प्रक्रिया न्यायालय स्वतःहून कायद्यात समाविष्ट करू शकत नाही. त्यामुळे व्हॉट्सॲप किंवा ईमेलद्वारे नोटीस किंवा एफआयआरची प्रत पाठवण्याचा अधिकार पोलिसांना नाही.

आरोपीला दंडाधिकाऱ्यांसमोर हजर केल्यानंतर त्याच्या अटकेला मंजुरी देण्यात आली होती. या आदेशाला आरोपीने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, आरोपी ४० दिवस नोटीस स्वीकारण्यापासून दूर राहिला आणि तपासात सहकार्य केले नाही. त्यामुळे त्याला अटक करणे योग्य असल्याचे स्पष्ट केले.

### अमेरिकेत इंधनाच्या किमती भडकल्या

**नवी दिल्ली** : इराणमधील तणाव आणि होर्मुझ सामुद्रधुनी बंद असल्यामुळे जागतिक इंधन संकट तीव्र झाले असून अमेरिकेलाही त्याचा मोठा फटका बसतोय. पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. अमेरिकेत पेट्रोलचा दर प्रति गॅलन ४.०९ डॉलरपर्यंत पोहोचला असून डिझेल ५.५३ डॉलरपर्यंत महागलाय. इंधन दरवाढीचा परिणाम कृषी, उद्योग आणि परिवहन क्षेत्रावर होत आहे. ई-कॉमर्स कंपनी ॲमेझॉनने डिलिव्हरीवर अतिरिक्त शुल्क लावण्याचा निर्णय घेतलाय, तर विमान तिकीट दरही वाढलेत. अमेरिकेचे आर्थिक नुकसान वाढत असून राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

## जगाला युद्धाची नव्हे, बुद्धाची गरज

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रतिपादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ठाणे** : सध्याच्या जागतिक युद्धजन्य परिस्थितीत जगाला युद्धाची नव्हे तर बुद्धांच्या शांततेच्या तत्वज्ञानाची गरज आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. कर्मकांडात अडकून न पडता भगवान बुद्धांचे विचार आचरणात आणण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. ठाण्यात आयोजित आठव्या आंतरराष्ट्रीय बौद्ध धम्म परिषदेत ते बोलत होते.

सम्राट अशोक जयंतीनिमित्त ठाण्यात आठव्या आंतरराष्ट्रीय बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. बुद्धरत्न सागर वेलफेअर फाउंडेशन यांच्या वतीने गडकरी रंगायतन येथे हा कार्यक्रम पार पडला. या परिषदेला खासदार ज्योती वाघमारे आणि महापौर शर्मिला पिंपळोकर यांच्यासह विविध देशांतून आलेले भन्ते उपस्थित होते. या परिषदेत भिक्खू संघाच्या वतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना 'बौद्ध रत्न' हा सन्मान देण्यात आला. त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना सन्मानचिन्ह देण्यात आले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या भारतीय संविधानाची प्रतही त्यांना भेट देण्यात आली. भिक्खू समाजाकडून त्यांना आशीर्वाद देण्यात आले आणि भविष्यात पुन्हा मुख्यमंत्री व्हावे अशा शुभेच्छाही व्यक्त करण्यात आल्या.

एकनाथ शिंदे म्हणाले की, धर्मवीर आनंद दिघे यांच्या ठाण्यातील लोकांनी एका सर्वसामान्य कार्यकर्त्याला मुख्यमंत्री बनवले. शांतता हवी असेल तर बुद्धांचे विचार आवश्यक आहेत. जगाला युद्ध नको, बुद्ध हवा. बुद्धांना केवळ मूर्तीत नाही तर विचारात शोधा आणि कर्मकांडात अडकू नका, असे आवाहन त्यांनी केले. संघदान ही बुद्धांप्रती समर्पणाची भावना असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### टोल मुदत २०६० पर्यंत वाढण्याची शक्यता

# मुंबई–पुणे एक्सप्रेसवे आता १० पदरी होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : वाढत्या वाहतूक कोंडीचा सामना करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ ने मुंबई-पुणे एक्सप्रेसवे १० पदरी करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. या प्रकल्पाचे काम येत्या पावसाळ्यानंतर सुरू होणार असून पुढील तीन वर्षांत, म्हणजेच २०२९-३० पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, अशी माहिती एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड यांनी दिली.

या प्रकल्पासाठी लागणारा निधी वित्तीय संस्थांकडून कर्जाच्या स्वरूपात उभारण्यात येणार आहे. या कर्जाची परतफेड करण्यासाठी सध्या सुरू असलेल्या टोल वसुलीची मुदत १५ वर्षांनी वाढवण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे या मार्गावरील टोल वसुली २०४५ ऐवजी २०६० पर्यंत सुरू राहण्याची शक्यता आहे. यामुळे प्रवाशांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असला, तरी प्रवास अधिक जलद आणि सुकर होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

एक्सप्रेसवेचे विस्तारीकरण टप्प्याटप्प्याने केले जाणार असून काम सुरू असताना वाहतुकीवर कोणताही परिणाम होऊ नये, यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. "वाहनचालकांना त्रास होणार नाही आणि वाहतूक सुरळीत राहील, याची पूर्ण काळजी घेतली जाईल," असे गायकवाड यांनी स्पष्ट केले. दरम्यान, एक्सप्रेसवेवरील सुमारे १३ किलोमीटरचा महत्त्वाचा 'मिसिंग लिंक' प्रकल्प मे महिन्यात सुरू होण्याची शक्यता आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई–पुणे दरम्यानचे अंतर कमी होऊन प्रवासाचा वेळही लक्षणीयरीत्या घटणार आहे. त्यामुळे चालक आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. एकूणच, १० पदरीकरण आणि 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे मुंबई–पुणे प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सुलभ होणार आहे. राज्यातील सर्वाधिक वर्दळीच्या या द्रुतगती मार्गावर होणाऱ्या या बदलामुळे भविष्यातील वाढती वाहतूक लक्षात घेऊन दीर्घकालीन उपाययोजना करण्यात येत असल्याचे स्पष्ट होत आहे.

## मंत्रालयातील लाचखोरी उघड

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : राज्याच्या प्रशासनाचा केंद्रबिंदू असलेल्या मंत्रालय येथे लाचखोरीचे आणखी एक गंभीर प्रकरण उघडकीस आले असून, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) ने अर्थ व नियोजन विभागातील कक्ष अधिकारी विलास लाड यांना रंगेहाथ अटक केली आहे. निधी मंजुरीसाठी तब्बल ६ लाख ३७ हजार रुपयांची लाच स्वीकारताना खारघर परिसरात सापळा रचून ही कारवाई करण्यात आली.

मंत्रालयातील अधिकाऱ्यांवर एसीबीची ही सलग दुसरी मोठी कारवाई असून काही दिवसांपूर्वीच एका मंत्र्याच्या स्वीय सहायकालाही लाच घेताना अटक करण्यात आली होती. त्यामुळे मंत्रालयातील भ्रष्टाचार पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ग्रामविकास विभागाचा निधी मंजूर करून देण्यासाठी विलास लाड यांनी संबंधितांकडून मोठ्या रकमेची मागणी केली होती. तक्रार प्राप्त झाल्यानंतर एसीबीने सापळा रचला आणि लाच स्वीकारताना त्यांना रंगेहाथ पकडले. विशेष म्हणजे, मार्च महिन्यात एसीबीने राज्यभरात कारवाईचा धडाका लावला होता. त्या वेळी आर्थिक वर्षअखेरच्या पार्श्वभूमीवर या कारवाया होत असल्याची चर्चा होती. मात्र, एप्रिल महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात मंत्रालयातच पुन्हा कारवाई झाल्याने प्रशासनातील भ्रष्टाचाराची व्याप्ती अधोरेखित झाली आहे.

## संपादकीय

# प्रेमातील कृत्रिमता




**मानवाने यंत्रे निर्माण केली, आता यंत्रे संवाद साधत आहेत. संवादातून सवय, सवयीमधून जिव्हाळा आणि जिव्हाळ्यातून नाते निर्माण होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात माणूस आणि यंत्र यांच्यातील नाते हा तांत्रिक नव्हे, तर सामाजिक आणि मानवी भवितव्याचा प्रश्न ठरत आहे.**

मानव इतिहासात तंत्रज्ञानाने अनेक बदल घडवले. वाफेच्या इंजिनाने उद्योगक्रांती घडवली, विजेने उत्पादन वाढवले, इंटरनेटने माहितीचे जग बदलले. पण कृत्रिम बुद्धिमत्ता एक वेगळाच बदल घडवत आहे. कारण पूर्वीची तंत्रज्ञान साधने होती; कृत्रिम बुद्धिमत्ता संवाद साधते. आणि संवाद ही केवळ माहिती देण्याची प्रक्रिया नसते; ती नातेसंबंध निर्माण करण्याची प्रक्रिया असते. आज जगात लाखो लोक दररोज चॅटबॉट्सशी बोलतात. काहीजण कामासाठी, काहीजण माहितीसाठी, काहीजण सल्ल्यासाठी आणि काहीजण फक्त बोलण्यासाठी. सुरुवातीला हा संवाद उपयोगाचा वाटतो. नंतर तो सवयीचा होतो. आणि सवयीचा संवाद हळूहळू भावनिक स्वरूप घेऊ लागतो. संशोधनात असे दिसून आले आहे की अनेक लोक चॅटबॉट्सशी वैयक्तिक गोष्टी बोलतात, सल्ला घेतात आणि काही वेळा भावनिक नातेही निर्माण करतात. यामागे एक साधे कारण आहे. माणसाला संवाद हवा असतो, न्याय न करणारा श्रोता हवा असतो आणि सतत उपलब्ध असलेली सोबत हवी असते. चॅटबॉट्स या तीनही गोष्टी देतापण याच ठिकाणी या तंत्रज्ञानाचा दुसरा, अधिक गुंतागुंतीचा प्रश्न सुरू होतो. मानवी नात्यांचे एक वैशिष्ट्य असते. त्या नात्यांमध्ये मतभेद असतात, गैरसमज असतात, तडजोड असते, संघर्ष असतो आणि म्हणूनच त्या नात्यांना अर्थ असतो. चॅटबॉट्सशी असलेल्या नात्यांमध्ये संघर्ष नसतो. कारण ते आपल्याशी सहमत होण्यासाठी तयार केलेले असतात. एका अभ्यासात असे दिसून आले की अनेक चॅटबॉट्स वापरकर्त्यांच्या विचारांशी सहमत राहण्याची प्रवृत्ती दाखवतात, अगदी ते विचार चुकीचे असले तरी. याचा अर्थ असा की चॅटबॉट्स आपल्याला आव्हान देत नाहीत; ते आपल्याला पुष्टी देतात. आणि सतत पुष्टी मिळत राहिली की माणूस स्वतःच्या विचारांबद्दल अधिक खात्री बाळगू लागतो. समाजात संवादाचे एक काम असते – आपल्याला चुकीचे असण्याची शक्यता दाखवणे. या तंत्रज्ञानाचा आणखी एक गंभीर पैलू म्हणजे भावनिक अवलंबित्व. काही लोक चॅटबॉट्सना मित्र, सल्लागार किंवा जोडीदारासारखे मानू लागले आहेत. काही प्रकरणांमध्ये लोकांनी भावनिकदृष्ट्या पूर्णपणे अशा कृत्रिम संवादावर अवलंबून राहिल्याची उदाहरणेही समोर आली आहेत. या प्रश्नाकडे केवळ भावनिक किंवा नैतिक दृष्टीने पाहून चालणार नाही. हा प्रश्न आर्थिक आणि राजकीयही आहे. कारण जगातील काही मोठ्या तंत्रज्ञान कंपन्या या कृत्रिम संवादाच्या साधनांवर नियंत्रण ठेवतात. म्हणजे भविष्यात मानवी संवादाचा एक मोठा भाग काही कंपन्यांच्या तंत्रज्ञानावर अवलंबून राहू शकतो. माहितीवर नियंत्रण ही एक गोष्ट आहे; पण भावना आणि संवादावर नियंत्रण ही अधिक मोठी गोष्ट आहे. याचा अर्थ असा नाही की कृत्रिम बुद्धिमत्ता वाईट आहे. प्रत्येक तंत्रज्ञानाप्रमाणे यालाही दोन बाजू आहेत. मुद्दा तंत्रज्ञानाचा नसतो; त्याच्या वापराचा असतो. समाजाने प्रत्येक नवीन तंत्रज्ञानाबद्दल सुरुवातीला अति आशावाद आणि नंतर अति भीती अशा दोन टोकांच्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेबाबतही तेच होत आहे. काही जण याला मानवजातीचे भविष्य मानतात, तर काही जण याला मानवजातीसाठी धोका मानतात. प्रश्न असा आहे की या तंत्रज्ञानामुळे मानवी नातेसंबंध, समाजरचना आणि विचारप्रक्रिया कशी बदलणार आहे. माणूस जर संवादासाठी, सल्ल्यासाठी, भावनिक आधारासाठी आणि निर्णयासाठी यंत्रांवर अवलंबून राहू लागला, तर मानवी समाजाची रचना बदलू शकते. समजून घेणे आणि समजल्यासारखे वाटणे यात फरक असतो. कृत्रिम बुद्धिमत्ता भावना अनुभवत नाही; ती भावनांची भाषा तयार करते. तंत्रज्ञान नेहमी मानवी जीवन सोपे करते. पण प्रत्येक तंत्रज्ञान माणसाला थोडे एकटेही करते. गाडी आल्यावर माणूस चालणे कमी करतो, फोन आल्यावर भेटणे कमी होते, सोशल मीडिया आल्यावर संवाद बदलतो. आता कृत्रिम बुद्धिमत्ता आल्यावर कदाचित माणूस बोलणे कमी करून लिहिणे आणि लिहिणे कमी करून विचारणे सुरू करेल. प्रश्न हा आहे की माणूस किती स्वतंत्र राहील. कारण यंत्रे हुशार होण्यापेक्षा माणसे अवलंबून होणे हा अधिक मोठा बदल असतो. कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग सुरू झाले आहे. आता प्रश्न तंत्रज्ञानाचा नाही; प्रश्न मानवी नातेसंबंधांचा आहे. आणि म्हणूनच भविष्यातील सर्वात मोठा प्रश्न कदाचित रोजगार, अर्थव्यवस्था किंवा युद्धाचा नसेल. तो माणूस आणि यंत्र यांच्यातील नात्याचा असेल.

# संकटाच्या उंबरठ्यावर उभे असलेले जग

जगातील घडामोडींकडे थोड्या अंतरावरून पाहिले, तर एक गोष्ट स्पष्ट दिसते. जगात संकटे नेहमीच होती. युद्धे होती, आर्थिक मंदी होती, राजकीय संघर्ष होते, दुष्काळ होते. पण तरीही आजची परिस्थिती वेगळी वाटते. कारण आजची संकटे स्वतंत्र राहिलेली नाहीत. ती एकमेकांत गुंतलेली आहेत. एका ठिकाणी युद्ध सुरू झाले की त्याचा परिणाम इंधनाच्या किमतीवर होतो, इंधनाच्या किमती वाढल्या की महागाई वाढते, महागाई वाढली की सरकारे अडचणीत येतात, सरकारे अडचणीत आली की राजकीय अस्थिरता वाढते. म्हणजे एक समस्या दुसरी समस्या निर्माण करते.



आज जगातील सर्वात मोठी समस्या कोणती, असा प्रश्न विचारला तर त्याचे एकच उत्तर मिळत नाही. काही जण युद्ध म्हणतील, काही जण हवामान बदल म्हणतील, काही जण आर्थिक मंदी म्हणतील, तर काही जण राजकीय ध्रुवीकरण म्हणतील. पण प्रत्यक्षात या सर्व समस्या वेगळ्या नाहीत. त्या एकाच मोठ्या बदलाच्या वेगवेगळ्या लक्षणांसारख्या आहेत. युद्धे अचानक सुरू होत नाहीत. ती दीर्घकाळ तयार होत असतात. आर्थिक स्पर्धा, संसाधनांवरील ताबा, भू-राजकीय हितसंबंध, राष्ट्रवाद, सुरक्षा या सर्व गोष्टी एकत्र येतात आणि मग एखादा संघर्ष उघड युद्धात बदलतो. जगातील संपत्ती वाढत आहे, अर्थव्यवस्था वाढत आहेत, उद्योग वाढत आहेत, तंत्रज्ञान वाढत आहे; पण त्याच वेळी आर्थिक असमानताही वाढत आहे. आर्थिक वाढ सर्वांसाठी समान संधी निर्माण करत नाही, अशी परिस्थिती निर्माण होत आहे. ही परिस्थिती दीर्घकाळ टिकली तर सामाजिक असंतोष वाढतो आणि राजकारण अधिक टोकाचे होते. राजकारणातील ध्रुवीकरण हा आजच्या जगातील आणखी एक मोठा बदल आहे. अनेक देशांमध्ये राजकारण दोन टोकांमध्ये विभागले गेले आहे. मधला विचार, तडजोड, समन्वय, सार्वजनिक चर्चा या गोष्टी कमी होत आहेत. राजकारण म्हणजे विरोधकांचा पराभव करणे, त्यांना पूर्णपणे बाजूला काढणे, अशी प्रवृत्ती वाढत आहे. लोकशाहीत विरोधक हे शत्रू नसतात; ते व्यवस्थेचा आवश्यक भाग असतात. पण अनेक ठिकाणी विरोधकांना शत्रूप्रमाणे वागवले जात आहे.

पर्यावरणाचा प्रश्न तर आता वर्तमानातील प्रश्न बनला आहे. तापमान वाढ, पाण्याची कमतरता, अनियमित पाऊस, जंगलांचा नाश, प्रदूषण या गोष्टींचे परिणाम जग अनुभवत आहे. पण पर्यावरणाचा प्रश्न अजूनही राजकारणाच्या केंद्रस्थानी आलेला नाही. कारण पर्यावरणाचे निर्णय दीर्घकालीन असतात आणि राजकारण अनेकदा अल्पकालीन असते. जगात समस्या संसाधनांच्या कमतरतेमुळे निर्माण होत नाहीत. जगाकडे अन्न आहे, पैसा आहे, तंत्रज्ञान आहे, ऊर्जा आहे, ज्ञान आहे. पण या सर्व गोष्टींचे न्याय्य आणि शहाणपणाने वितरण करण्याची राजकीय इच्छा कमी पडते. म्हणजे समस्या तांत्रिक नसून राजकीय आणि नैतिक आहे. बाहेरचा शत्रू हा शेवटचा धक्का असतो; पतनाची प्रक्रिया आधीच सुरू झालेली असते. आजच्या जगातही तशीच काही चिन्हे दिसतात. राष्ट्रे अधिक शक्तिशाली होत आहेत, पण समाज अधिक अस्थिर होत आहेत. अर्थव्यवस्था मोठ्या होत आहेत, पण सामान्य माणसाची असुरक्षितता वाढत आहे. माहिती आणि तंत्रज्ञान वाढत आहे, पण समाजातील संवाद कमी होत आहे. लोक एकमेकांशी बोलण्यापेक्षा एकमेकांविरुद्ध बोलत आहेत. मतभेद हे लोकशाहीचे लक्षण असते; पण द्वेष हा लोकशाहीचा शत्रू असतो.

> **» मानवजातीने विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था आणि संवाद यात प्रगती केली, पण जग सुरक्षित, न्याय्य किंवा स्थिर झाले का, हा प्रश्न अनुत्तरित आहे. आजची संकटे वेगवेगळी नसून परस्परांशी जोडलेली आहेत, हीच खरी चिंतेची बाब आहे.**

सध्या अनेक ठिकाणी मतभेदांचे रूपांतर द्वेषात होताना दिसते.

सभ्यतेचा खरा कस युद्धाच्या काळात लागत नाही; तो शांततेच्या काळात लागतो. युद्धाच्या वेळी समाज एकत्र येतो. पण शांततेच्या काळात समाज विभागला जातो. त्या वेळी समाजाने स्वतःला नियंत्रित करावे लागते. शत्रू बाहेर नसतो; तो अनेकदा आपल्या व्यवस्थेत, आपल्या अर्थकारणात, आपल्या राजकारणात आणि कधी कधी आपल्या विचारांमध्येही असतो.

आज जग एका निर्णायक वळणावर आहे, असे म्हणण्याचे कारण म्हणजे पुढील काही दशकांमध्ये जगाला ऊर्जा, पाणी, अन्न, पर्यावरण, स्थलांतर, तंत्रज्ञान, रोजगार या सर्व प्रश्नांवर मोठे निर्णय घ्यावे लागणार आहेत. हे निर्णय कठीण असतील, काही निर्णय अलोकप्रिय असतील, काही निर्णय महागडे असतील. पण निर्णय टाळण्याची किंमत अधिक महाग असते. शेवटी कोणत्याही सभ्यतेचे भविष्य तिच्या तंत्रज्ञानावर ठरत नाही; ते तिच्या निर्णयक्षमतेवर ठरते. समाज योग्य वेळी योग्य निर्णय घेतो की नाही, यावर सभ्यता टिकते किंवा कोसळते. जगासमोरची सर्वात मोठी समस्या कोणती, हा प्रश्न चुकीचा आहे. कारण समस्या अनेक आहेत. खरा प्रश्न असा आहे की जगाला आपल्या समस्यांची जाणीव आहे का आणि त्या सोडवण्यासाठी आवश्यक ते कठोर निर्णय घेण्याची तयारी आहे का. सभ्यतेचा अंत अज्ञानामुळे होत नाही; तो अनेकदा माहिती असूनही निर्णय न घेतल्यामुळे होतो. आणि म्हणूनच आज जग अंताच्या टोकावर उभे आहे, असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही.

# पिंपरी-चिंचवडला पुरेल इतके पाणी

## पवना धरणात ४६.५५ टक्के साठा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहराची तहान भागविणाऱ्या पवना धरणमध्ये ४६.५५ टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्याची नोंद झाली आहे. वाढत्या उन्हामुळे आणि पाण्याच्या वाढत्या मागणीमुळे धरणातील साठा झपाट्याने घटत असला तरी हा साठा जून महिन्यापर्यंत म्हणजेच पावसाळ्यापर्यंत पुरेल, असा दिलासा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.



मावळ तालुक्यातील पवनानगर येथील या धरणातून पिंपरी-चिंचवड शहराला मुख्यत्वे पाणीपुरवठा केला जातो. महापालिकेकडून पवना नदीवरील रावेत येथील बंधाऱ्यातून दररोज सुमारे ५२० एमएलडी पाणी उचलून प्रक्रिया केल्यानंतर ते शहरभर वितरित केले जाते. याशिवाय एमआयडीसीकडून ३० एमएलडी पाणी घेऊन काही भागांची गरज भागवली जाते.

आंद्रा धरण पाणी योजनेअंतर्गत इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्यातून दररोज ८० ते ९० एमएलडी पाणी उचलून चिलखी जलशुद्धीकरण केंद्रातून शुद्ध करून पुरवठा केला जात आहे. शहरात गेल्या सव्वासहा वर्षांपासून दोन दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. आंद्रा धरणमध्ये ५३.६८ टक्के, भामा आसखेड धरणमध्ये ६२.३७ टक्के आणि मुळशी धरणमध्ये ४५.२४ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मात्र भामा आसखेड प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित नसल्याने शहराला अपेक्षित १६७ एमएलडी पाणी मिळत नाही.

सध्याच्या परिस्थितीत उपलब्ध पाणीसाठा पुरेसा असला तरी वाढत्या तापमानामुळे साठ्यात जलद घट होत असल्याने नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. पाण्याची गळती टाळणे, नळजोड दुरुस्त ठेवणे तसेच पिण्याच्या पाण्याचा वापर वाहन धुणे किंवा इतर अनावश्यक कामांसाठी टाळावा, असे आवाहन महापालिकेचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

# १५ वर्षांवरील वाहनांवर आरटीओची कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) पर्यावरण कर वसुलीसाठी शहरात विशेष मोहीम हाती घेतली असून, १५ वर्षांहून जुनी वाहने लक्ष्य करण्यात आली आहेत. कर न भरलेल्या वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई सुरू असून, नियमभंग केल्यास व्याजासह दंड आकारला जात आहे.

आरटीओच्या माहितीनुसार, गेल्या वर्षभरात ३७ हजार ४३८ वाहनांची तपासणी करण्यात आली. या मोहिमेतून एकूण ९ कोटी ५६ लाख ९० हजार २९५ रुपयांची दंडवसुली करण्यात आली आहे. यावरून मोठ्या प्रमाणात वाहनधारकांनी पर्यावरण कर भरण्याकडे दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट झाले आहे. शहरात आरटीओच्या वायुवेग पथकाने विविध ठिकाणी तपासणी नाके उभारले असून, विशेषतः १५ वर्षांपेक्षा जुनी वाहने थांबवून त्यांची कागदपत्रे तपासली जात आहेत. कर थकीत आढळल्यास संबंधित वाहनधारकांना जागेवरच नोटीस देऊन दंड आकारला जातो. गरज भासल्यास वाहन जप्त करण्याची कारवाईही केली जात आहे.पर्यावरण कराचा उद्देश महसूल गोळा करणे नसून, वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे हा आहे. जुनी वाहने अधिक धूर सोडत असल्याने त्यांची तपासणी करून ती पर्यावरणपूरक आहेत की नाही, याची खात्री केली जाते. कर भरल्यानंतर वाहनाला पुढील पाच वर्षांसाठी वैधता मिळते.

# दोन महिन्यांत पाइप्ड गॅस जोडणी पूर्ण करण्याचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** राज्यातील गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर सरकारने पाइप्ड नॅचरल गॅस जोडण्यांना गती देण्याचा निर्णय घेतला असून, पुढील दोन महिन्यांत जिथे शक्य आहे तिथे पाइप्ड गॅस जोडणी पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जोडणी प्रक्रियेत जाणीवपूर्वक टाळाटाळ केल्यास संबंधितांवर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिला.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीत गॅस टंचाईच्या प्रश्नावर चर्चा झाल्यानंतर अवघ्या बारा तासांत मुख्य सचिवांनी गॅस कंपन्यांच्या वितरकांची बैठक घेतली. या बैठकीत उद्योग, हॉटेल व्यवसाय तसेच व्यावसायिक आस्थापनांना प्राधान्याने पाइप्ड गॅस जोडणी देण्याच्या सूचना देण्यात आल्या. मंत्री उदय सामंत यांनी नुकताच पिंपरी, चिंचवड, भोसरी आणि मावळ विधानसभा मतदारसंघातील शिवसेना, महिला आघाडी, युवासेना आणि युवती सेनेच्या कामाचा आढावा घेतला. थेरगाव येथे झालेल्या बैठकीला शिवसेना उपनेते खासदार श्रीरंग बारणे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. एमएनजीएल कंपनीकडून ज्या भागात पाइप्ड गॅस कनेक्शन देणे शक्य आहे, त्या ठिकाणी पुढील दोन महिन्यांत जोडणी देण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

# देहूतील इंद्रायणी घाटाला जलपर्णीचा विळखा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** इंद्रायणी नदीच्या घाटावर मोठ्या प्रमाणात जलपर्णी, प्लास्टिक पिशव्या आणि बाटल्यांचा साठा झाल्याने परिसर अस्वच्छ झाला असून वारकरी आणि भाविकांना स्नानासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे देहूतील घाट परिसराच्या स्वच्छतेबाबत प्रशासनावर नाराजी व्यक्त होत आहे.



देहू येथे राज्यभरातून दररोज हजारो वारकरी आणि भाविक येत असतात. इंद्रायणीच्या पवित्र पाण्यात स्नान करून मंदिरात दर्शनासाठी जाण्याची परंपरा आहे. मात्र सध्या घाटावरील पायऱ्यांजवळ मोठ्या प्रमाणात जलपर्णी साचल्याने भाविकांना पाण्यात उतरणेही कठीण झाले आहे. पहाटे स्नानासाठी येणाऱ्या अनेक भाविकांना जलपर्णीचे ढीग आणि काठावर साचलेला कचरा पाहून माघारी फिरावे लागत असल्याचे चित्र आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, दरवर्षी देहू नगरपंचायतीकडून नदीतील जलपर्णी काढण्यासाठी लाखो रुपयांचे टेंडर काढले जाते. मात्र प्रत्यक्षात नदीतील जलपर्णीची परिस्थिती कायम असल्याचे दिसत आहे. नदीकाठावर अनेक ठिकाणी काढलेल्या जलपर्णीचे ढीग तसेच पडून असल्याने खर्च नेमका कुठे होतो, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

घाट परिसरात नगरपंचायतीच्या कचऱ्याच्या गाड्यादेखील उभ्या केल्या जात असल्याने परिसरात दुर्गंधी पसरते. घाटावर दशक्रिया विधी, धार्मिक कार्यक्रम तसेच पंगतीचे कार्यक्रमही होत असतात. अशावेळी दुर्गंधीमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार भाविकांनी केली आहे.

अस्वच्छतेमुळे वारकऱ्यांच्या धार्मिक भावना दुखावल्या जात असल्याची भावना व्यक्त होत असून प्रशासनाने तातडीने नदीतील जलपर्णी काढून घाट परिसर स्वच्छ करावा, काठावर साचलेले कचऱ्याचे ढीग हटवावेत, अशी मागणी नागरिक आणि भाविकांकडून होत आहे. घाट परिसर स्वच्छ झाल्यास वारकरी आणि भाविकांना पवित्र स्नान करता येईल आणि देहूची धार्मिक परंपरा अधिक सन्मानाने जपली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## सुंधा ज्वेलर्स प्रकरणात ४० हून अधिक ग्राहकांची फसवणूक झाल्याचा आरोप

# सोनाराकडून २६ लाखांची फसवणूक; आरोपी पसार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**देहूरोड :** येथील सुंधा ज्वेलर्स प्रकरणात मोठी आर्थिक फसवणूक उघडकीस आली आहे. दुकानात सोन्याचे दागिने रिपेअरिंग, नवीन दागिने तयार करणे तसेच सोने मोड करण्यासाठी दिलेली रक्कम आणि दागिने परत न देता ग्राहकांची फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

देहूरोड परिसरातील सुंधा ज्वेलर्स, सुभाष चौक, मेन बाजार येथे दि. १ जानेवारी २०२६ ते ३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत हा प्रकार घडल्याची नोंद आहे. फिर्यादी आणि इतर साक्षीदारांनी मिळून एकूण ₹२६,६०,१५० किमतीचे तसेच सुमारे ६५७ ग्रॅम सोन्याचे दागिने आरोपींना विश्वासाने दिले




होते. या प्रकरणात अंबालाल जिवाजी सोनी (वय ५६) आणि रोहित अंबालाल सोनी (वय ३०), दोघेही विकासनगर, किवळे, पुणे येथील रहिवासी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी दागिने व रक्कम परत न देता दुकान बंद करून फरार झाल्याचा आरोप आहे. या घटनेत सुमारे ४० ग्राहकांची फसवणूक झाल्याचेही समोर आले आहे. या प्रकरणी पोउपनि डोंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू असून आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. आरोपी अद्याप अटक नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### भंगार गोळा करणाऱ्या व्यक्तीवर रॉडने हल्ला

चिंचवड परिसरात किरकोळ कारणावरून भंगार गोळा करणाऱ्या व्यक्तीवर लोखंडी रॉडने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. चिंचवड येथील बिजलीनगर परिसरात दि. ३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. फिर्यादी माऊली सूर्यवंशी यांच्या ऑफिससमोर भंगारच्या बाटल्या गोळा करत असताना आरोपी आणि फिर्यादी यांच्यात वाद झाला.

या प्रकरणात संतोष जालींदर रणवरे (वय ४०, रा. निगडी ओटा स्कीम, बौद्धनगर) आणि भरत किशोर दोलारामन (रा. बिजलीनगर, चिंचवड) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी एक आरोपी अटक करण्यात आला असून दुसऱ्याची माहिती तपासात आहे. वादादरम्यान आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ व धक्काबुक्की केली. तसेच लोखंडी रॉडने डाव्या पायाचे गुडघे, उजवा गुडघा, डाव्या हाताचे खांदे, बोटे आणि डोक्यावर मारहाण करून गंभीर जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी पोउपनि झिंजुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

### डिलिव्हरी बॉयवर हल्ला; नाक फ्रॅक्चर, दात पडले

पिंपरी-चिंचवडमधील संत तुकारामनगर परिसरात एका डिलिव्हरी बॉयवर जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. चहाच्या टपरीवरून सुरू झालेल्या किरकोळ वादातून आरोपींनी तरुणावर बेदम मारहाण केली. या हल्ल्यात पीडिताचा नाक फ्रॅक्चर झाला असून दातही पडल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या प्रकरणी संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ११७ (२), ३५२, ३ (५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी एका आरोपीला अटक केली असून दुसरा आरोपी फरार आहे. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. जखमी तरुणाला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत मुख्य आरोपीला अटक केली असून फरार आरोपीचा शोध सुरू आहे.

# गॅस वितरकांवर कारवाई कधी? तक्रारी करूनही नागरिक हैराण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात अजूनही नागरिकांना गॅस सिलिंडरसाठी वणवण फिरावे लागत असल्याचे चित्र आहे. गॅस वितरकांच्या कार्यालयात फोन केला तर प्रतिसाद मिळत नाही, तर कार्यालयात गेल्यावर ते बंद असल्याचे आढळते. याबाबत अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडे तक्रारी करूनही संबंधितांवर कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. तक्रार करायची तरी कुठे? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरात तीन गॅस विक्रेत्या कंपन्यांचे एकूण सुमारे ४१ गॅस वितरक कार्यरत आहेत. शहरातील सुमारे साडेसहा लाख ग्राहकांनी गॅससाठी नोंदणी केली आहे. यातील बहुतांश ग्राहकांनी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड किंवा हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपन्यांच्या गॅस वितरकांकडे नोंदणी केली आहे. नागरिकांच्या तक्रारी वाढल्यानंतर प्रशासनाने काही वितरकांची तपासणी केली आहे. आतापर्यंत पाच गॅस वितरकांच्या कार्यालयांची तपासणी करून त्याचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना पाठवण्यात आला आहे. जिल्हाधिकारी संबंधितांवर कारवाई करतील, अशी माहिती चिंचवड परिमंडळ अधिकारी डॉ. विजयकुमार क्षीरसागर यांनी दिली.

दरम्यान, शहरात गॅस टंचाई, वितरणातील विलंब, फोनला प्रतिसाद न देणे, कार्यालय बंद ठेवणे अशा तक्रारी सातत्याने समोर येत असून, संबंधित वितरकांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### हातभट्टी अड्ड्यावर पोलिसांचा छापा

**लोणी काळभोर :** हातभट्टी दारू साठवून ती कॅनमध्ये भरून विविध ठिकाणी पुरवठा करण्यासाठी पाठविण्यात येत असलेल्या अड्ड्यावर लोणी काळभोर पोलिसांनी छापा टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत सुमारे तीन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तिघांना अटक करण्यात आली आहे. ही कारवाई लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील आलमगीर जामा मशिद कब्रस्तान परिसरात शनिवारी (ता. ४) सकाळी सुमारे सव्वानऊ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली. पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे हा छापा टाकण्यात आला. या कारवाईत मुबारक जाफर गड्डे (वय ४८) व बानो मुबारक गड्डे (वय ४०) यांना घटनास्थळावरून ताब्यात घेण्यात आले. तसेच हातभट्टी दारूचा पुरवठा करणारा समीर संजय राठोड (वय २३, रा. शिंदवणे) यालाही पोलिसांनी अटक केली आहे.

### जमिनीच्या वादातून वृद्धावर हल्ला

**दौंड :** जुन्या जागेच्या व्यवहाराच्या वादातून एका वृद्धावर लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना खानोटा (ता. दौंड) येथे घडली. किरकोळ वादातून थेट प्राणघातक हल्ला झाल्याने परिसरात खळबळ उडाली असून या प्रकरणी बाप-लेकांवर दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २८ मार्च रोजी मध्यरात्रीच्या सुमारास खानोटा येथे घडली. जुन्या जागेच्या व्यवहाराच्या कारणावरून दोन्ही बाजूंमध्ये वाद झाला होता. हा वाद वाढत जाऊन त्याचे रूपांतर मारहाणीत झाले. यावेळी आरोपींनी संतापाच्या भरात एका वृद्ध व्यक्तीच्या डोक्यात लोखंडी रॉडने जोरदार वार केला. या हल्ल्यात संबंधित वृद्ध गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. या प्रकरणी विलास तुकाराम जाधव आणि त्याचा मुलगा कुणाल (दोघे रा. खानोटा, ता. दौंड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नुकसानग्रस्त भागाची दिलीप वळसे-पाटील यांच्याकडून पाहणी

# अवकाळीने मोडले शेतकऱ्यांचे कंबरडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** माजी मंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात बुधवारी सायंकाळी झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेल्या भागांची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा दिला. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

यावेळी त्यांनी कृषी व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना देत नुकसानाचा अहवाल लवकरात लवकर जिल्हा प्रशासनाकडे सादर करण्याचे निर्देश दिले. अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना त्वरित मदत मिळाली पाहिजे. नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, असे आश्वासन वळसे-पाटील यांनी दिले.

या पाहणी दौऱ्यात प्रभारी तहसीलदार सचिन वाघ, मार्केट कमिटीचे सभापती निलेश थोरात, उपसभापती सचिन पानसरे, पंचायत समिती सदस्या अंकिता वाळुंज, माजी पंचायत समिती सदस्य रवींद्र करंजखेले, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे युवक अध्यक्ष वैभव उंडे, खरेदी-विक्री संघाचे माजी अध्यक्ष अनिल वाळुंज, तसेच अजय आवटे, महेंद्र वाळुंज यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लाखणगाव, खडकवाडी, पोंदेवाडी, वाळुंजनगर, रोडेवाडी फाटा, लोणी, रानमळा, रोडेझाप, धुमाळस्थळ आदी गावांना गारपीटीचा जोरदार फटका बसला. सायंकाळी साडेतीन ते चार वाजण्याच्या सुमारास ढगांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस झाला आणि सुपारीएवढ्या गारा कोसळल्याने रस्ते, शेत, गोठे आणि घरांच्या अंगणात गारांचा खच साचला.

या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतांमध्ये पाणी साचल्याने ओढे-नाले तुडुंब भरले. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना सर्वाधिक फटका बसला असून काढणीसाठी ठेवलेला कांदा भिजला आहे, तर उभ्या पिकांचे शेंडे मोडून पडले आहेत. कांद्याच्या बिजोत्पादनालाही मोठा धक्का बसला आहे. तसेच काढणीस आलेला गहू व हरभरा पाण्यात भिजून भुईसपाट झाला असून मिरची, कलिंगड, फ्लॉवर, काकडी यांसारख्या भाजीपाला पिकांचेही नुकसान झाले आहे. आंब्याच्या झाडांवरील कच्च्या कैऱ्या गळून पडल्याने फळबागांचेही मोठे नुकसान झाले. काही ठिकाणी निवासी पत्राशेड व पोल्ट्री शेडचेही नुकसान झाल्याचे समोर आले आहे.

अगोदरच बाजारभाव नसल्याने अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांवर या अवकाळी पावसाने दुहेरी संकट ओढवले आहे. त्यामुळे शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी परिसरातील शेतकरी व स्थानिक पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

## महात्मा गांधी विद्यालयात करिअर मार्गदर्शन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** खेड तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात 'बारावीनंतरचे करिअर' या विषयावर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रात विद्यार्थ्यांना पारंपरिक शाखांपलीकडील विविध करिअर संधींची सविस्तर माहिती देण्यात आली.

करिअर मार्गदर्शक व समुपदेशक विवेक वेलणकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, बारावी विज्ञान शाखेनंतर केवळ मेडिकल आणि इंजिनिअरिंग हेच पर्याय नसून इतरही अनेक क्षेत्रांमध्ये उत्तम करिअर करता येऊ शकते. पशुवैद्यकशास्त्र, आर्किटेक्चर, बायोटेक्नॉलॉजी, संशोधन क्षेत्र, संरक्षण क्षेत्र, कृषी, फार्मसी तसेच गणित आणि संख्याशास्त्र या क्षेत्रांमध्येही मोठ्या संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनिवडी व क्षमतांचा विचार करून योग्य क्षेत्र निवडावे, असे त्यांनी मार्गदर्शन करताना नमूद केले. तसेच पालकांनीही विविध प्रवेश परीक्षा व अभ्यासक्रमांची माहिती करून घेऊन आपल्या पाल्याच्या भवितव्यासाठी योग्य दिशा ठरवावी, असे आवाहन त्यांनी केले. संस्थेच्या बाफना रंगमंदिर सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमाला बारावीचे विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी संस्थेच्या संचालिका उर्मिलाताई सांडभोर, व्यवस्थापकीय अधिकारी कैलास पाचारणे, प्राचार्या संध्या कांबळे, उपमुख्याध्यापिका रेखा जाधव, कनिष्ठ महाविद्यालयाचे विभागप्रमुख दशरथ पिलगर, पर्यवेक्षक लतीफ शाह, सुनीता ठाकूर, संदेश जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय पर्यवेक्षक संदेश जाधव यांनी करून दिला. सूत्रसंचालन माधुरी हुंडारे यांनी केले तर आभार प्रदर्शन दीपक वाळुंज यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन शीला नाईकरे यांनी केले.

# लोणी पोलीस अकॅडमीतील चार मुलींची पोलीस दलात भरती






■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील लोणी येथील माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनी संचलित पोलीस अकॅडमीमधील चार मुलींची नुकतीच पुणे शहर पोलीस व पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलात निवड झाली आहे. ग्रामीण भागातील मुलींनी मिळवलेल्या या यशामुळे त्यांचे कौतुक होत आहे.

लोणी येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रातून प्रशिक्षण घेतलेल्या कोमल संपत वाळुंज हिने १३४ गुण मिळवत पुणे शहर पोलीस दलात दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला. सायरा सलीम शेख (१३३ गुण) हिची पिंपरी-चिंचवड पोलीस दलात चांगल्या गुणांनी निवड झाली. धनश्री पोपट राजगुडे (१३२ गुण) हिचीदेखील पिंपरी-चिंचवड पोलीस दलात निवड झाली असून सीमा नवनाथ वाळुंज (१२३ गुण) हिचीही पिंपरी-चिंचवड पोलीस दलात भरती झाली आहे.

लोणी येथील माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनीमार्फत ग्रामीण भागातील मुला-मुलींना भारतीय सैन्य व पोलीस दलात संधी मिळावी यासाठी नाममात्र खर्चात प्रशिक्षण दिले जाते. श्री भैरवनाथ प्रशाला, लोणी येथे हे प्रशिक्षण सुरू असून काही विद्यार्थी निवासी स्वरूपातही प्रशिक्षण घेत आहेत. प्रशिक्षणामध्ये धावणे, शारीरिक व्यायाम, जनरल नॉलेज, लेखी प्रश्नपत्रिका सोडविणे तसेच शारीरिक कसोटीचा सराव घेतला जातो.

या विद्यार्थ्यांना शिक्षक राहुल पडवळ, सागर जोरी, माजी प्राचार्य अरुण साकोरे हे मार्गदर्शन करीत आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनीचे अध्यक्ष उदयराजे वाळुंज पाटील, मार्गदर्शक उपसचिव डॉ. कैलास गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी प्रकाश वाळुंज पाटील, लोकनियुक्त सरपंच डॉ. सावळा भाऊ नाईक, प्रबोधिनीचे सदस्य तसेच ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# अनधिकृत बांधकाम हटवण्याची मागणी

## तहसीलदार प्रशांत बेडसे यांना निवेदन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** येथील शासकीय विश्रामगृहाच्या जागेवर कथित अनधिकृत कब्जा करून उभारण्यात आलेले बांधकाम तात्काळ हटवण्यात यावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांच्या वतीने तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून शासकीय जागेवरील अतिक्रमण दूर करावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संबंधित शासकीय विश्रामगृहाच्या जागेवर पूर्वी कोणतेही अधिकृत प्रार्थनास्थळ किंवा धार्मिक बांधकाम नव्हते. मात्र गेल्या काही वर्षांपासून त्या ठिकाणी अनधिकृतपणे बांधकाम उभारण्यात आले असून तेथे काहीजण एकत्र येत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. ही जागा शासकीय मालकीची असल्याने त्या ठिकाणी कोणतेही बांधकाम करण्यासाठी संबंधित प्रशासनाची परवानगी आवश्यक असते. मात्र अशा कोणत्याही अधिकृत परवानगीची नोंद उपलब्ध नसल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. तसेच संबंधित बांधकामाची शासकीय नोंद, परवानगी, मालकी हक्क यांची चौकशी करून ते बांधकाम अनधिकृत आढळले, तर ते तात्काळ हटवून शासकीय जागा प्रशासनाने ताब्यात घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणाकडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशीही भूमिका निवेदनात मांडण्यात आली आहे.

या संदर्भात खेड राजगुरुनगर येथील प्रांताधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अभियंता, उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच पोलीस निरीक्षक यांची प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी तक्रार देण्यात आली असल्याचे नागरिकांनी सांगितले. प्रशासनाने या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून शासकीय जागेवरील अतिक्रमणाबाबत योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदन देताना शिवशंकर स्वामी, वाकळवाडीचे सरपंच नरेंद्रजी वाळुंज, अक्षयजी पर्हाड, प्रतिक दौंडकर, प्रतिक ताठे, मयूर भगत आदी उपस्थित होते.

# भव्य सभागृह विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर :** ओतूर येथील ग्राम विकास मंडळ संचलित चैतन्य विद्यालय ओतूर येथे ६ हजार चौरस फूट आकाराच्या स्वर्गीय भरत एकनाथ तांबे सभागृहाचे उद्घाटन त्यांच्या पत्नी कल्पना भरत तांबे यांच्या हस्ते करण्यात आले. हा समारंभ ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला, अशी माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.

स्व. भरत एकनाथ तांबे हे १९७३ च्या एस.एस.सी. बॅचचे चैतन्य विद्यालयाचे माजी विद्यार्थी होते. त्यांनी मुंबई पोलीस दलामध्ये सहाय्यक पोलिस आयुक्त पदावर कार्य करून सेवा पूर्ण केली होती. त्यांच्या स्मृती कायम राहाव्यात आणि जन्मभूमीतील शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तांबे कुटुंबीयांनी चैतन्य विद्यालयाला त्यांच्या नावाने भव्य सभागृह बांधून दिले.

१ एप्रिल हा स्व. भरत तांबे यांचा जन्मदिवस असल्याने त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून हे सभागृह त्यांच्या पत्नी कल्पना तांबे व परिवाराच्या वतीने विद्यालयास हस्तांतरित करण्यात आले. या सभागृहामुळे विद्यालयाच्या भौतिक सुविधांमध्ये मोठी भर पडली असून विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांसाठी विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध होणार आहेत.

समारंभात तांबे कुटुंबीयांच्या वतीने नूतन आवटे व प्रमोद एकनाथ तांबे यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, नोकरीनिमित्त मुंबईत वास्तव्यास असलो तरी ओतूर या जन्मभूमीबद्दल कायमच जिव्हाळा राहिला आहे. ज्या शाळेत शिक्षण घेतले, ज्या शिक्षकांनी घडविले त्या संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमात विद्यालयाच्या भौतिक सुविधांसाठी जयसिंग गोपाळ तांबे व सुनील जयसिंग तांबे (सहाय्यक पोलिस आयुक्त) यांच्या वतीने एक लाख रुपये तर प्रमोद एकनाथ तांबे यांनी ५१ हजार रुपयांचा धनादेश ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे यांच्याकडे सुपूर्द केला. तसेच शिवनेरीचे शिलेदार समूह व स्व. भाऊ कोंडाजी पाटील डुंबरे प्रतिष्ठान यांच्या वतीने महापुरुषांची आत्मचरित्रे व ग्रंथ विद्यालयाला भेट देण्यात आले. या कार्यक्रमास ग्राम विकास मंडळाचे पदाधिकारी, ग्रामस्थ, शिक्षक, पालक व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हुतात्मा हरी मकाजी नाईक यांना जेजुरीत अभिवादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जेजुरी :** आद्यक्रांतीवीर उमाजी राजे नाईक यांच्या प्रेरणेने इंग्रजी राजवटीविरुद्ध बंड पुकारणारे हुतात्मा हरी मकाजी नाईक यांचे बलिदान प्रेरणादायी असल्याचे मत नगराध्यक्ष जयदीप बारभाई यांनी व्यक्त केले. पुढील काळात हुतात्मा स्मारकाचे सुशोभीकरण करून येथे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी नगरपालिका प्रयत्न करेल, असे आश्वासन त्यांनी दिले.

इंग्रजी राजवटीविरोधात बंडाचे निशाण उभारणारे हरी मकाजी नाईक तसेच त्यांच्या पाच सहकाऱ्यांना ४ एप्रिल १८८९ रोजी जेजुरी येथे वडाच्या झाडाला फाशी देण्यात आली होती. त्यांच्या हौतात्म्याच्या स्मृती चिरंतन राहाव्यात यासाठी राज्य शासनाने जेजुरी येथे हुतात्मा स्मारक उभारले आहे. दरवर्षी ४ एप्रिल रोजी नगरपालिका व पोलिस प्रशासनाच्या वतीने पुष्पचक्र अर्पण करून त्यांना अभिवादन केले जाते.

नगराध्यक्ष जयदीप बारभाई, मुख्याधिकारी चारुदत्त इंगुळे, पर्यवेक्षक बाळासाहेब खोमणे, जेजुरी पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक नागनाथ पाटील, उमाजी राजे नाईक मंडळाचे राज्याध्यक्ष आप्पासाहेब चव्हाण, अठरा अलुते बारा बलुतेदार संघाचे आप्पासाहेब भंडलकर, आरपीआयचे पंढरीनाथ जाधव, देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त मंगेश घोणे, विश्वस्त पोपट खोमणे, नगरसेवक योगेश जगताप, शिवाजी जगताप, रोहित खोमणे, स्वप्नील हरपळे, कृष्णा कुदळे, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, माजी विश्वस्त नितीन राऊत, कामगार नेते सुरेश उबाळे, अशोक खोमणे, रवींद्र खोमणे, नगरसेविका भक्ती कोरपड आदींसह विविध ठिकाणांहून आलेले पदाधिकारी व अनुयायी उपस्थित होते. प्रास्ताविक शिवराज झगडे यांनी केले तर आभार बाळासाहेब खोमणे यांनी मानले.

# भैरवनाथ जल्लोष २०२६ उत्साहात




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** खडकवाडी (ता. आंबेगाव) येथे सालाबादप्रमाणे याही वर्षी भैरवनाथ महोत्सव जल्लोष २०२६ अंतर्गत सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे आयोजन अंगणवाडी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यात आला. विद्यार्थ्यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनातील प्रसंगाचा देखावा सादर केला. तसेच शेतकरी नृत्य, कोळी नृत्य, शिवरायांचा पोवाडा आणि 'महती संतांची' हे नाटक विद्यार्थ्यांनी सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून भरभरून दाद मिळाली.

या कार्यक्रमाला ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, पालकवर्ग, खडकवाडीचे ग्रामस्थ तसेच माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांनी मोलाचे योगदान दिले.

## चाकण बाजारात ५ कोटी ८५ लाखांची उलाढाल

# कांद्याच्या आवकेत मोठी घट; दर स्थिरच

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये कांद्याच्या आवकेत लक्षणीय घट झाली असली तरी दरात कोणतीही वाढ झालेली नाही. तब्बल ४ हजार ५०० क्विंटलने आवक घटूनही कांद्याचे दर १,३०० रुपये प्रति क्विंटलवर स्थिर राहिल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्यात ठप्प झाल्याचा परिणाम स्थानिक बाजारावर दिसून येत असून, यंदाच्या हंगामात अपेक्षित दरवाढ झालेली नाही.

चाकण बाजारात कांद्याची एकूण आवक ५ हजार क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ५ हजार ५०० क्विंटलने कमी झाली असली तरी दरात बदल झाला नाही. बटाट्याची आवक १,२५० क्विंटल झाली असून कमाल भाव १,३०० रुपयांवरून १,२०० रुपयांवर स्थिरावला आहे. लसणाची आवक ४० क्विंटल झाली असून त्याचा कमाल भाव १२ हजार रुपयांवरून १० हजार रुपयांपर्यंत घसरला. हिरव्या मिरचीची आवक ३६५ क्विंटल झाली असून तिला ४ हजार ते ५,५०० रुपये दर मिळाला.

फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक वाढल्याने दरात काही प्रमाणात चढ-उतार दिसून आला. टोमॅटो ३१८ क्विंटल (८०० ते १,२०० रुपये), कोबी २४० क्विंटल (५०० ते ७०० रुपये), फ्लॉवर १८८ क्विंटल (८०० ते १,४०० रुपये), वांगी ९० क्विंटल (१,००० ते १,५०० रुपये), भेंडी ८४ क्विंटल (२,५०० ते ४,००० रुपये), दोडका ५७ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रुपये), कारली ६७ क्विंटल (२,००० ते ३,००० रुपये), दुधीभोपळा ६२ क्विंटल (१,००० ते १,६०० रुपये), काकडी ९३ क्विंटल (१,००० ते १,६०० रुपये), फरशी २० क्विंटल (३,००० ते ४,००० रुपये), वालवड ४२ क्विंटल (३,००० ते ४,००० रुपये), ढोबळी मिरची १४८ क्विंटल (२,००० ते ४,००० रुपये), चवळी ४२ क्विंटल (१,५०० ते २,५०० रुपये), वाटाणा ६० क्विंटल (५,००० ते ६,००० रुपये), शेवगा ३५ क्विंटल (२,१७० ते २,५०० रुपये), गाजर ५७ क्विंटल (१,००० ते २,००० रुपये), गवार ४८ क्विंटल (५,००० ते ७,००० रुपये) आणि आले १६० क्विंटल (३,००० ते ४,००० रुपये) असा दर मिळाला.

पालेभाज्यांची आवक मोठ्या प्रमाणात वाढली असून मेथीच्या १४,१७५ जुड्या (६०० ते १,००० रुपये), कोथिंबिरीच्या २७,५९० जुड्या (४०० ते ७०० रुपये), शेपूच्या २,५४५ जुड्या (८०० ते १,००० रुपये) आणि पालकाच्या ३,००० जुड्या (४०० ते ६०० रुपये) बाजारात दाखल झाल्या.

आवक वाढल्याने या पालेभाज्यांच्या दरात घसरण झाल्याचे दिसून आले.

## आळंदीत इंद्रायणी नदीचे पाणी फेसाळले...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतून सोडल्या जाणाऱ्या रसायनयुक्त सांडपाण्यामुळे इंद्रायणी नदी आज पहाटेपासून फेसाळली होती. प्रदूषण युक्त सांडपाण्याबरोबरच जलपर्णी पाण्याच्या प्रवाहाबरोबर नदीपत्रात वाहून गेल्याचे चित्र आहे.

पंधरा वर्षांपासून पिंपरी चिंचवड महापालिका तसेच अन्य काही ग्रामपंचायत नगरपरिषद हद्दीतून रासायनीच सांडपाणी थेट नदीपात्रात मिसळले जात आहे. इंद्रायणी नदीपात्रामध्ये सांडपाणी मिसळल्याने नदीला अक्षरशः गटाराचे स्वरूप प्राप्त झाले आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये प्रदूषण नियंत्रण मंडळाचा स्वतंत्र विभाग आहे. मात्र रासायनिक सांडपाणी सोडले जाण्याचे प्रमाण महापालिका हद्दीतून वाढले तरी हे प्रदूषण नियंत्रण महामंडळ काहीच उपाययोजना करत नसल्याचे चित्र आहे. चिखली, कुदळवाडी, तळवडे, मावळ भागातील ग्रामपंचायत, नगरपंचायत यासारख्या भागांमधील औद्योगिक विभागातून येणारे पाणी तसेच सांडपाणी यावर नियंत्रण नसल्यानेच आळंदीमध्ये थेट इंद्रायणीला गटाराचे स्वरूप आले आहे. पालिका हद्दीतून होणारे सांडपाणी मिश्रणाबाबत मात्र आळंदीकरांना कोणतेही निराकरण महापौर तसेच महापालिका अधिकाऱ्यांकडून झाले नाही.

## सारांश वृत्त

### ट्रेकिंगला गेलेली महिला बेपत्ता

**बंगळूरः** कोडगू जिल्ह्यातील ताडियांदामोल टेकड्यांवर ट्रेकिंगसाठी गेलेली एक ३६ वर्षीय महिला जंगलात बेपत्ता झाली आहे. तिच्या शोधासाठी अतिरिक्त कर्मचारी आणि ड्रोन कॅमेरे तैनात करण्यात आले आहेत, अशी माहिती कर्नाटकचे वनमंत्री ईश्वर खंड्रे यांनी रविवारी दिली. त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी तरुणीच्या बेपत्ता होण्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

### गोव्यात ईस्टर उत्साहात साजरा

**पणजी** : येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचे प्रतीक असलेला ईस्टर सण साजरा करण्यासाठी, रविवारी गोव्यामध्ये उत्साहाचे वातावरण होते. मध्यरात्रीच्या जागरणासह आणि पारंपरिक मेजवान्यांसह हा सण साजरा करण्यात आला. या निमित्ताने किनारपट्टीवरील राज्यातील हजारो भाविकांनी चर्च आणि प्रार्थनास्थळांमध्ये गर्दी केली होती. जुन्या गोव्यातील ऐतिहासिक कॅथेड्रलपासून ते साल्सेट आणि बार्देझमधील लहान चॅपल्सपर्यंत, ४० दिवसांच्या लेंट उपवासाच्या समाप्तीचे प्रतीक असलेल्या पास्का मेणबत्तीच्या आशीर्वादाचे साक्षीदार होण्यासाठी हजारो भाविकांनी मध्यरात्रीच्या आणि सकाळच्या प्रार्थना सत्रांना हजेरी लावली. अनेक गावांमध्ये, हा सण मेजवान्या आणि सामुदायिक उत्सवांच्या हंगामाची नांदी ठरतो.

### वेगवेगळ्या अपघातांत ४ जणांचा मृत्यू

**लातेहार/पलामू** : झारखंडच्या लातेहार आणि पलामू जिल्ह्यांमध्ये वेगवेगळ्या रस्ते अपघातांमध्ये चार जणांचा मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी रविवारी दिली. लातेहारमध्ये भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने मोटारसायकलला समोरून धडक दिल्याने दोघांचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात शनिवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास बालुमठ-मुरपा मुख्य रस्त्यावर घडला, अशी माहिती पोलीस अधिकाऱ्याने दिली. मृत व्यक्तींची ओळख डोकनाही टोला येथील कामेश ओराओन आणि विजेंद्र ओराओन अशी पटली आहे, असे त्याने सांगितले.

## लोकसंख्या नियंत्रण केलेल्या राज्यांसाठी हमीची मागणी

# परिसीमन प्रक्रियेवर केरळचा आक्षेप

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : आगामी परिसीमन प्रक्रियेबाबत केरळ सरकारने आक्षेप नोंदवत लोकसंख्या नियंत्रणात यशस्वी ठरलेल्या राज्यांना घटनात्मक हमी देण्याची मागणी केली आहे. केरळचे मुख्यमंत्री पिनारयी विजयन यांनी केंद्र सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करत परिसीमन प्रक्रिया डोळे झाकून स्वीकारण्याऐवजी तिची सखोल छाननी होणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दक्षिणेकडील राज्यांच्या लोकसभा जागा कमी केल्या जाणार नाहीत, असे दिलेले आश्वासन पुरेसे नाही. जागांची संख्या कमी न होणे हा मुख्य मुद्दा नसून संघराज्यातील प्रमाणशीर प्रतिनिधित्व आणि राजकीय वजन टिकून राहणे अधिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ते म्हणाले की, जर केवळ सध्याच्या लोकसंख्येच्या आधारे मतदारसंघ पुनर्रचना करण्यात आली, तर केरळ, तामिळनाडू आणि लोकसंख्या नियंत्रण व सामाजिक विकासात पुढे असलेल्या इतर राज्यांना अप्रत्यक्ष शिक्षा मिळेल. त्यामुळे सर्व राज्यांमध्ये लोकसंख्या स्थिर होईपर्यंत आंतरराज्यीय जागांचे प्रमाण १९७१ च्या जनगणनेच्या आधारेच कायम ठेवावे, अशी केरळ सरकारची भूमिका आहे.

लोकसभा जागांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढवण्याच्या चर्चांवरही त्यांनी चिंता व्यक्त केली. जागा वाढल्या तरी मोठ्या लोकसंख्येच्या राज्यांचे प्रतिनिधित्व अधिक वाढेल आणि त्यामुळे दक्षिणेकडील राज्यांचा सापेक्ष राजकीय प्रभाव कमी होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले. इतक्या महत्त्वाच्या विषयावर केंद्र सरकारने एकतर्फी निर्णय न घेता आंतरराज्य परिषद आणि संसदेमार्फत सर्व राज्यांचे मत जाणून एकमताने निर्णय घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

सामाजिक विकास आणि लोकसंख्या नियंत्रणात यशस्वी ठरलेल्या राज्यांच्या राजकीय प्रतिनिधित्वावर परिणाम होणार नाही, याची स्पष्ट घटनात्मक हमी केंद्र सरकारने द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

एकूण जागांच्या संख्येत कोणतीही वाढ अशा प्रकारे केली पाहिजे की, त्यामुळे मानवी विकास निर्देशांकांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या राज्यांची सापेक्ष ताकद कमी होणार नाही. आपल्या प्रजासत्ताकाच्या अगदी पायावर परिणाम करणारा एवढा मोठा निर्णय केंद्र सरकार लादू शकत नाही. यासाठी सर्व घटक राज्यांची विविधता आणि सार्वभौम हक्कांचा आदर राखून, आंतरराज्य परिषद आणि संसदेमार्फत एकमत होणे आवश्यक आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

भारताची एकता ही लोकसंख्येच्या आकाराची पर्वा न करता, सर्व प्रदेशांना मिळणाऱ्या समान आदरावर आणि सत्तावाटपावर अवलंबून आहे. ज्या राज्यांनी राष्ट्राच्या प्रगतीचे नेतृत्व केले आहे, त्यांच्या हक्कांनाही राजकीय समानतेची संकल्पना लागू होईल, हे पंतप्रधानांनी सुनिश्चित केले पाहिजे, असेही त्यांनी म्हटले आहे.

परिसीमन प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर उत्तर आणि दक्षिण राज्यांमधील राजकीय सत्तासंतुलनाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, येत्या काळात या विषयावर राजकीय वाद अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# नितीश कुमार १० एप्रिलला राज्यसभेची शपथ घेणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पटना** : बिहारचे विद्यमान मुख्यमंत्री आणि जनता दल (युनायटेड) चे प्रमुख नितीश कुमार हे १० एप्रिल रोजी राज्यसभेचे खासदार म्हणून शपथ घेणार असल्याची माहिती बिहार भाजप नेते संजय सरावगी यांनी दिली आहे.

शपथविधीनंतर मुख्यमंत्री, भाजपचे केंद्रीय नेतृत्व आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील (एनडीए) मित्रपक्ष यांच्यात मंत्रिमंडळ स्थापनेवर संयुक्तपणे चर्चा होणार असल्याचे सरावगी यांनी सांगितले. यामधून शासनाच्या पुढील टप्प्यासाठी समन्वित धोरण आखले जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत. बिहारमधील वाढत्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर ही घडामोड महत्त्वाची मानली जात आहे. नुकतेच राज्यसभेसाठी निवडून आल्यानंतर नितीश कुमार यांनी बिहार विधान परिषदेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात महत्त्वाचे स्थित्यंतर घडल्याचे मानले जात आहे.

५ मार्च रोजी ७५ वर्षीय नितीश कुमार यांनी आपला निर्णय जाहीर केला होता. राज्य विधानसभा आणि संसद या दोन्ही स्तरांवर काम करण्याची आपली दीर्घकाळाची इच्छा असल्याचे त्यांनी सांगितले होते. तसेच "विकसित बिहार" घडवण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करत सरकारला सतत सहकार्य आणि मार्गदर्शन करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. एनडीएतील नेत्यांनी त्यांच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. बिहारचे उपमुख्यमंत्री विजय सिन्हा यांनी सांगितले की, हा त्यांचा वैयक्तिक निर्णय असून घटनात्मक तरतुदीनुसार एका सभागृहाची शपथ घेतल्यावर दुसऱ्या सभागृहाच्या सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा लागतो.

# काँग्रेसची मोदींवर जोरदार टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : लोकसभेच्या जागा वाढवण्याच्या प्रस्तावावरून काँग्रेसने रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार टीका केली. या निर्णयामुळे मोठ्या व अधिक लोकसंख्या असलेल्या राज्यांना विषम फायदा होईल, असा आरोप काँग्रेसने केला आहे.

विरोधी पक्षाने पुरेशी चर्चा न करता हा प्रस्ताव पुढे रेटला जात असल्याचा आरोप केला असून, त्याच्या परिणामांबाबत जनतेची दिशाभूल केली जात असल्याचेही म्हटले आहे. काँग्रेसचे संचार प्रभारी सरचिटणीस जयराम रमेश यांनी पंतप्रधानांवर टीका करत म्हटले की, लोकसभेची संख्या ५० टक्क्यांनी वाढवून प्रत्येक राज्याच्या जागाही तितक्याच वाढवल्या, तरी दक्षिणेकडील राज्यांना फटका बसणार नाही, हा दावा दिशाभूल करणारा आहे.

रमेश यांनी सांगितले की, सध्या लोकसभेत उत्तर प्रदेश आणि केरळमधील जागांमधील फरक सुमारे ६० आहे. प्रस्तावानंतर हा फरक ९० पर्यंत वाढू शकतो. त्याचप्रमाणे उत्तर प्रदेश आणि तामिळनाडू यांच्यातील फरक ४१ वरून किमान ६१ पर्यंत जाईल. यामुळे मोठ्या राज्यांचे वर्चस्व अधिक वाढेल, असे त्यांनी स्पष्ट केले. काँग्रेसने असा आरोप केला की, या प्रस्तावामुळे पंजाब, हरियाणा तसेच ईशान्येकडील राज्यांचा सापेक्ष राजकीय प्रभाव कमी होण्याची शक्यता आहे. देश सध्या आर्थिक आणि परराष्ट्र धोरणांच्या गंभीर आव्हानांना सामोरा जात असताना, केंद्र सरकारने व्यापक जनचर्चा टाळून अशा महत्त्वाच्या विषयावर निर्णय घेणे चुकीचे असल्याचेही पक्षाने म्हटले आहे.

२०२९ च्या निवडणुकांपूर्वी महिला आरक्षण कायद्याची अंमलबजावणी सुलभ करण्यासाठी लोकसभेची संख्या ५४३ वरून ८१६ पर्यंत वाढवण्याचा विचार सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर हा वाद निर्माण झाला आहे.

# ...तर निष्पक्ष निवडणुका शक्य होणार नाहीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पटना** : निवडणूक आयोग निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांवर किंवा सत्ताधाऱ्यांवर अवलंबून असेल, तर निवडणुकांची निष्पक्षता सुनिश्चित करणे शक्य नाही, असे मत सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश बी. व्ही. नागरत्ना यांनी व्यक्त केले. चाणक्य विधी विद्यापीठ येथे आयोजित राजेंद्र प्रसाद स्मृती व्याख्यानात त्या बोलत होत्या.

१९९५ मधील सर्वोच्च न्यायालयाच्या एका महत्त्वाच्या निकालाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, न्यायालयाने निवडणूक आयोगाला निवडणुकांची निष्पक्षता सुनिश्चित करण्याची जबाबदारी सोपवलेली एक अत्यंत महत्त्वाची घटनात्मक संस्था म्हणून मान्यता दिली आहे. मात्र, जर निवडणुका घेणारी संस्था त्या निवडणुका लढवणाऱ्यांवरच अवलंबून असेल, तर संपूर्ण प्रक्रियेच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते, असे त्यांनी स्पष्ट केले.

न्यायमूर्ती नागरत्ना म्हणाल्या की, निवडणुका या केवळ ठराविक कालावधीनंतर होणाऱ्या घटना नसून, राजकीय सत्ता निर्माण करण्याची आणि बदलण्याची ही एक महत्त्वाची घटनात्मक यंत्रणा आहे. वेळेवर निवडणुका घेतल्यामुळे सरकारमध्ये सुरळीत बदल होतात, हे भारताच्या घटनात्मक लोकशाहीने दाखवून दिले आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणे म्हणजे राजकीय स्पर्धेच्या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासारखे आहे, असे त्यांनी सांगितले.

त्या म्हणाल्या की, सत्तेचा वापर केवळ औपचारिक संस्थांमार्फत होत नाही, तर निवडणुका, सार्वजनिक वित्त, नियमन आणि प्रशासन अशा प्रक्रियांमधूनही सत्ता टिकून राहते. त्यामुळे घटनात्मक व्यवस्थेला पारंपरिक त्रिपक्षीय रचनेपलीकडे जाऊन या संस्थांकडे पाहावे लागेल. या संस्था घटनात्मक सुव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत, असे त्यांनी नमूद केले. जेव्हा संस्था एकमेकांवर नियंत्रण ठेवणे थांबवतात, तेव्हा लोकशाहीची संरचना कमकुवत होते. अशा वेळी निवडणुका होत राहू शकतात, न्यायालये चालू राहू शकतात, संसद कायदे करू शकते; पण सत्तेवर प्रभावी नियंत्रण राहत नाही, कारण संस्थात्मक शिस्तच नष्ट होते, असे त्यांनी सांगितले.

# खनिज महसुलात छत्तीसगडची मोठी झेप

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**रायपूर** : तांत्रिक नवोपक्रम आणि सक्षम व्यवस्थापनाच्या जोरावर छत्तीसगड सरकारने खाणकाम क्षेत्रात महत्त्वपूर्ण टप्पा गाठला असून, राज्याला खनिज महसुलातून १६,६२५ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला आहे. हा महसूल २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ठरवलेल्या वार्षिक उद्दिष्टाच्या ९८ टक्के असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

राज्याच्या खनिज-आधारित अर्थव्यवस्थेची ताकद आणि पारदर्शक प्रशासनाच्या धोरणांची परिणामकारकता या कामगिरीतून दिसून येत असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. खनिज संसाधन विभागाचे सचिव पी. दयानंद यांनी सांगितले की, छत्तीसगडमध्ये खनिज महसुलात वार्षिक १४ टक्के वाढ नोंदवली गेली आहे. मागील पाच वर्षांतील ६ टक्के सरासरी चक्रवाढ वार्षिक वाढ दराच्या तुलनेत ही वाढ दुप्पट आहे.

अधिकाऱ्यांच्या मते, ही महसूलवाढ राज्य सरकारच्या सुशासन उपक्रमांतर्गत प्रभावी धोरण अंमलबजावणी, मजबूत देखरेख यंत्रणा आणि तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शक्य झाली आहे. विक्रमी महसुलाचे श्रेय विविध धोरणात्मक उपाययोजनांना दिले जात आहे. यामध्ये एनएमडीसी आणि इतर सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांसाठी प्रेषण मार्गांचे प्रभावी नियोजन, 'खनिज २.०' या आयटी-आधारित प्लॅटफॉर्मची अंमलबजावणी, तसेच खनिज वाहतूक नियंत्रणासाठी तंत्रज्ञानाचा वापर यांचा समावेश आहे.

## आखाती देशांतील पायाभूत सुविधांचे नुकसान

# इराणच्या हल्ल्यांचा फटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**दुबई** : पश्चिम आशियातील संघर्ष तीव्र होत असताना रविवारी इराण कडून आखाती प्रदेशातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर हल्ले करण्यात आले. या हल्ल्यांमध्ये संयुक्त अरब अमिरात, बहरीन आणि कुवेत येथील नागरी आणि औद्योगिक सुविधांचे नुकसान झाल्याचे वृत्त आहे.

फेब्रुवारीच्या अखेरीस सुरू झालेल्या अमेरिका आणि इस्रायल यांच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून इराणकडून गेल्या काही आठवड्यांपासून आखाती देशांवर वारंवार ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले होत आहेत. इराणने तेलसमृद्ध आखाती देशांमधील ऊर्जा आणि औद्योगिक पायाभूत सुविधांना लक्ष्य केले असून, हे देश अमेरिकी सैन्याला त्यांच्या भूमीतून कारवाई करण्याची परवानगी देत असल्याचा आरोप केला आहे. मात्र आखाती देशांनी हे आरोप फेटाळले आहेत. संयुक्त अरब अमिरातीतील अबू धाबी प्रशासनाने सांगितले की, देशाच्या वायव्य किनारपट्टीवरील रुवैस औद्योगिक शहरातील एका पेट्रोकेमिकल प्रकल्पात लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. हवाई संरक्षण यंत्रणेने काही क्षेपणास्त्र आणि ड्रोन रोखल्यानंतर कोसळलेल्या अवशेषांमुळे ही आग लागल्याचे सांगण्यात आले. या घटनेनंतर संबंधित औद्योगिक प्रकल्पातील कामकाज तात्पुरते बंद करण्यात आले असून कोणतीही जीवितहानी झालेली नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. इराणच्या लष्कराने संयुक्त अरब अमिरातीतील ॲल्युमिनियम उद्योग आणि कुवेतमधील अमेरिकी लष्करी तळांना लक्ष्य केल्याचा दावा इराणच्या अधिकृत वृत्तसंस्थेने केला आहे. इराणने यापूर्वीही आखाती देशांमधील नागरी पायाभूत सुविधांवर हल्ल्याच्या धमक्या दिल्या होत्या.

बहरीनमध्ये इराणच्या ड्रोन हल्ल्यामुळे ऊर्जा कंपनीच्या साठवण टाकीला आग लागल्याची घटना घडली. आग विझवण्यात यश आले असून परिस्थिती नियंत्रणात असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या घटनेतही जीवितहानी झालेली नाही. कुवेतमध्ये ड्रोन हल्ल्यामुळे वीज आणि पाणी शुद्धीकरण प्रकल्पांचे मोठे नुकसान झाले असून दोन वीज निर्मिती युनिट्स बंद पडल्याची माहिती कुवेतच्या वीज आणि जल मंत्रालयाने दिली आहे.

तेहरानकडून वाढत्या धमक्या आता खार पाणी गोड करणाऱ्या प्रकल्पांपर्यंत पोहोचल्या असून आखाती वाळवंटी देश त्यांच्या पाणीपुरवठ्यासाठी या प्रकल्पांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहेत. त्यामुळे या हल्ल्यांमुळे संपूर्ण आखाती प्रदेशातील सुरक्षा परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे.

# अस्थिर परिस्थितीत सुरक्षिततेचे आव्हान वाढले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : पश्चिम आशियातील युद्ध आणि बदलत्या जागतिक परिस्थितीमुळे जग अधिक अस्थिर आणि अनिश्चित बनले असून अशा परिस्थितीत स्वतःला सुरक्षित ठेवण्याचे मोठे आव्हान देशांसमोर उभे राहिले आहे, असे प्रतिपादन परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी केले.

आयआयएम रायपूर येथील पदवीधर विद्यार्थ्यांना संबोधित करताना ते बोलत होते. यावेळी त्यांनी बदलत्या जागतिक व्यवस्थेवर भाष्य करताना सांगितले की, सध्या जगात सुरू असलेली उलथापालथ केवळ राजकीय नसून संरचनात्मक स्वरूपाची आहे. देशांच्या सापेक्ष शक्ती, प्रभाव आणि आर्थिक सामर्थ्यात मोठे बदल होत असून जागतिक व्यवस्था आपल्या डोळ्यांसमोर बदलत आहे.

ते म्हणाले की, तंत्रज्ञान, ऊर्जा, लष्करी क्षमता, संपर्क व्यवस्था आणि संसाधने यांमधील नव्या घडामोडींमुळे जागतिक स्पर्धा अधिक तीव्र झाली आहे. अनेक देश या घटकांचा वापर धोरणात्मक शस्त्र म्हणून करत आहेत. त्यामुळे जागतिक स्तरावर जोखीम वाढली असून प्रत्येक देश जोखीम व्यवस्थापन, विविधीकरण आणि सुरक्षित गुंतवणूक यावर भर देत आहे.

जयशंकर यांनी सांगितले की, सध्याची पिढी विकसित भारत घडवण्याच्या महत्त्वाच्या टप्प्यावर उभी आहे. मागील दशकात भारताने विकासाच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली असून पुढील दशकात भारत आणखी मोठी झेप घेण्यासाठी सज्ज आहे, असे त्यांनी नमूद केले.

या दशकातील प्रमुख आव्हानांचा उल्लेख करताना त्यांनी कोविड महामारी, जागतिक संघर्ष आणि हवामान बदल ही तीन मोठी आव्हाने असल्याचे सांगितले. महामारीमुळे काम करण्याची आणि जगण्याची पद्धत बदलली, तर जागतिक संघर्षांचे दूरगामी परिणाम संपूर्ण जगावर होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## आंध्र प्रदेशमध्ये दहशतवादी गट उघड

**अमरावती** : आयसिस सारख्या अतिरेकी संघटनांशी संबंध असल्याचा संशय असलेले, तसेच भारतातील तरुणांना कट्टरपंथी बनवण्यात कथितरित्या सामील असलेले एक दहशतवादी मॉड्यूल उघडकीस आले आहे, अशी माहिती संबंधित सूत्राने दिली. आंध्र प्रदेश पोलिसांनी या नेटवर्कशी संबंधित असलेल्या राज्यातील तिघांसह डझनभर संशयितांना अटक करण्यासाठी बिहार, दिल्ली, कर्नाटक, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, तेलंगणा आणि राजस्थानमध्ये पथके तैनात केली होती.

# बंगालसाठी डाव्यांचा जाहीरनामा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**कोलकाता** : सीपीआय(एम) च्या नेतृत्वाखालील डाव्या आघाडीने बंगालमधील विधानसभा निवडणुकीसाठी जाहीरनामा प्रसिद्ध केला असून, मंदिर-मस्जिद राजकारणाऐवजी रोजगार, उद्योग, कामगार हक्क आणि महिला सुरक्षेच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. डावी आघाडी कडून कोलकाता येथील प्रमोद दासगुप्ता भवन येथे जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ मार्क्सवादी नेते बिमान बोस, सीपीआय(एम) चे राज्य सचिव मोहम्मद सलीम तसेच आघाडीतील नेते उपस्थित होते.

डाव्या आघाडीने आपल्या जाहीरनाम्यात राज्यातील बेरोजगारी, औद्योगिकीकरण, महिलांची सुरक्षा आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासनावर भर दिला आहे. रोजगार निर्मिती आणि सरकारी भरती प्रक्रिया पारदर्शक करण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे. याशिवाय, नादिया जिल्ह्यातील कालिगंज येथे पोटनिवडणुकीनंतर झालेल्या बॉम्बस्फोटातील पीडितांना न्याय देण्याचे आश्वासनही डाव्या आघाडीने दिले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर डाव्या आघाडीने रोजगार आणि उद्योग या मुद्द्यांवर भर देत सत्ताधारी पक्ष आणि भाजपवर अप्रत्यक्ष टीका केल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

## इराणच्या संरक्षक दलाचा दीर्घकालीन संघर्षाचा इतिहास

# आयआरजीसी शरणागती पत्करण्याची शक्यता कमी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**तेहरान** : मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इराणच्या क्रांतिकारी रक्षक दलाची (आयआरजीसी) भूमिका पुन्हा चर्चेत आली आहे. अमेरिका आणि इस्रायलच्या हवाई हल्ल्यांमुळे मोठे नुकसान झाले असले, नेतृत्वातील अनेक वरिष्ठ अधिकारी मारले गेले असले तरी आयआरजीसी शरणागती पत्करण्याची शक्यता अत्यंत कमी असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. संघटनेचा इतिहास, लढाऊ अनुभव, आर्थिक व राजकीय प्रभाव यामुळे हे दल दीर्घकालीन संघर्षासाठी तयार असल्याचे दिसून येत आहे.

इराणच्या सशस्त्र दलांमधील सर्वात मोठा घटक असलेल्या आयआरजीसीकडे सुमारे १,९०,००० सैनिक असून बसिज या निमलष्करी दलातील सुमारे ४,५०,००० राखीव स्वयंसेवकांचेही जाळे आहे. या दलाचा प्रभाव केवळ लष्करापुरता मर्यादित नसून राजकारण, गुप्तचर यंत्रणा आणि अर्थव्यवस्थेवरही मोठ्या प्रमाणावर आहे.

आयआरजीसीची स्थापना १९७९ च्या इराणी इस्लामिक क्रांतीनंतर झाली. सुरुवातीला इस्लामिक प्रजासत्ताकाचे संरक्षण करणारे दल म्हणून त्याची स्थापना झाली होती. १९८० मध्ये इराकने इराणवर आक्रमण केल्यानंतर या दलाने राष्ट्रीय सैन्यासोबत युद्धात सहभाग घेतला आणि तेथूनच त्याची लढाऊ शक्ती म्हणून ओळख निर्माण झाली. त्यानंतर देशातील कुर्द आणि बलुच बंडखोरी दडपण्यातही या दलाने महत्त्वाची भूमिका बजावली.

१९८२ मध्ये आयआरजीसीने 'कुड्स फोर्स' नावाचे परदेशी मोहिम दल स्थापन केले. या दलामार्फत लेबनॉनमधील हिजबुल्लाह आणि इराकमधील शिया सशस्त्र गटांना मदत करण्यात आली. या गटांनी गुरिल्ला युद्ध, स्फोटक हल्ले आणि दीर्घकालीन संघर्षाच्या माध्यमातून अमेरिका आणि इस्रायलला मोठे नुकसान पोहोचवले. इराक आणि लेबनॉनमधील संघर्षातून आयआरजीसीला अप्रत्यक्ष युद्धाचा मोठा अनुभव मिळाला आहे.

अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव अनेक दशकांपासून सुरू आहे. २००२ मध्ये अमेरिकेने इराणला 'दुष्ट शक्तींच्या अक्षात' समाविष्ट केल्यानंतर संबंध अधिकच बिघडले. त्यानंतर इराणने अणुकार्यक्रम आणि आयआरजीसी मजबूत करण्यावर भर दिला. काही काळ इस्लामिक स्टेटविरुद्ध लढताना अप्रत्यक्ष सहकार्य झाले होते, मात्र नंतर पुन्हा तणाव वाढला.

आयआरजीसीचा प्रभाव इराणच्या अर्थव्यवस्थेतही मोठा आहे. बांधकाम, पायाभूत सुविधा, तेल, मीडिया आणि सेवा क्षेत्रात या दलाशी संबंधित कंपन्यांचे मोठे जाळे असून अर्थव्यवस्थेतील मोठा हिस्सा त्यांच्या नियंत्रणात असल्याचे मानले जाते. त्यामुळे आयआरजीसी ही केवळ लष्करी संघटना नसून एक प्रकारचे सावलीतील सत्ताकेंद्र मानले जाते.

गेल्या काही महिन्यांतील हवाई हल्ल्यांमुळे आयआरजीसीचे नुकसान झाले असले, तरी संघटनेची रचना मजबूत आहे. नेतृत्वातील बदल झाले तरी संघटना टिकून राहते, हा इतिहास पाहता स्पष्ट होते. त्यामुळे इराणवर थेट आक्रमण झाल्यास आयआरजीसी दीर्घकालीन आणि चिवट प्रतिकार करेल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.